पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ ● Board of Examinations and Evaluation

Ref. No. PAHSUS/EXAM/2023/ 1790 Date : 4 AUG 2023

## परिपत्रक

**प्रति,**
मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर

**विषय: विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेचे गुणपडताळणी(Verification), गुणपडताळणीतील चुक(Counting Mistake) उत्तरपत्रिका व तपासणे (Not Assess), पुनर्मुल्यांकन (Revaluation) बाबत..**

सदर्भ : सोविसो/परिक्षा/२०१७/३०१७, दि. २३/११/२०२७

महोदय,

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये यापुर्वी विद्यार्थ्याची गुणपडताळणी (Verification), गुणपडताळणीतील चुक (Counting Mistake), उत्तरपत्रिकेतील काही भाग तपासवयाचे राहुन गेला असेल (Not Assess), व पुनर्मुल्यांकन (Revaluation) इत्यादी बाबत व तसेच त्याबाबतचे शुल्का बाबत सविस्तर आपणास अवगत करण्यात आले होते.

तथापि, विद्यार्थ्यांना सदरचे परिपत्रक अवगत नसल्याने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठास चुकीचे अर्ज प्राप्त होत आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या परिपत्रकान्वये विद्यार्थ्यास मार्गदर्शन करुन तसे अर्ज सादर करण्याच्या सुचना दयाव्यात. तसेच सदरील परिपत्रक आपल्या महाविद्यालयाच्या फलकावर दर्शनी भागावर लावण्यात यावे.

( डॉ. म. स. रोकडे )
प्र. संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत- माहितीस्तव - मा. कुलगुरु कार्यालय,
- प्र. कुलगुरु कार्यालय
- कुलसचिव कार्यालय

सोलापूर विद्यापीठ
परीक्षा विभाग
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७-२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३ /७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
सं`तस्थळ:http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

Solapur University
Examination Section
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217-2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in

संदर्भ क्रं. सोविसो/परीक्षा/२०१७ / 3017

दि. २१/११/२०१७ 23 NOV 2017

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये,
सोलापूर विद्यापीठ सोलापूर

**विषय : विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेचे गुणपडताळणी (Verification), गुणपडताळणीतील चूक (Counting Mistake) उत्तपत्रिका न तपासणे (Not Assess), पूनर्मूल्यांकन (Revaluation) बाबत...**

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी गुणपडताळणी (Verification), किंवा पूनर्मूल्यांकनासाठी (Revaluation) महाविद्यालयामार्फत अर्ज सादर करतात. गुणपडताळणी (Verification), गुणपडताळणीतील चूक (Counting Mistake), उत्तरपत्रिकेतील काही भाग तपासवयाचे राहून गेला असेल (Not Assess.) व पूनर्मूल्यांकन (Revaluation) या चार वेगवेगळया पध्दती आहेत.

**१) गुणपडताळणी (Verification) :-** यामध्ये उत्तरपत्रिकेतील सर्व गुणांची पडताळणी केली जाते. तसेच उत्तरपत्रिका मूल्यमापन केली नसेल तर उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन करुन घेण्यात येते व निकाल प्रसिध्द केला जातो. गुणपडताळणीसाठी एका विषयास रु. ५०/- इतके शुल्क आकारण्यात येते. तसेच विद्यार्थी सर्व विषयासाठी गुणपडताळणी अर्ज सादर करु शकतात. परंतू गुणपडताळणीसाठी अर्ज केलेल्या विषयाची छायांकित प्रत विद्यार्थ्यास घेता येणार नाही.

**२) गुणपडताळणीतील चूक (Counting Mistake) :-** उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर जर उत्तरपत्रिकेमध्ये प्राध्यापकांकडून गुण देण्याचे राहिल्यास, एकूण गूणांची बेरीज चूकीची असेल, उत्तरपत्रिकेतील प्रथम पानावर गुण न दिल्यास गुणपडताळीणीतील चूक (Counting Mistake) यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे अर्ज सादर करावा. याकरीता शुल्क आकारण्यात येत नाही.

**३) उत्तरपत्रिका न तपासणे (Not Assess.) :-** उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त झाल्यांनतर जर उत्तरत्रिकेमधील एखादा प्रश्न तपासला नसेल, MCQ बरोबर असताना चूकीचे दिले असेल, तर विद्यार्थ्यांनी पूनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर न करता, Not assess साठी विद्यापीठाकडे अर्ज सादर करावा. याकरीता शुल्क आकारण्यात येत नाही.

**४) पूनर्मूल्यांकन (Revaluation) :-** विद्यार्थ्यांनी ज्या विषयाची छायांकित प्रत घेतली असेल त्याच विषयासाठी पूनर्मूल्यांकन अर्ज सादर करावे. अर्जासोबत गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडावे. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेतील पूनर्मूल्यांकनापूर्वीचे गुण झाकले (Hide) जातात. व पूनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्याचे उत्तपत्रिका पूर्ण तपासली जाते. पूनर्मूल्यांकनासाठी एका विषयास रु. ५००/- इतके शुल्क आकारण्यात येते.

उपरोक्त बाब सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व परीक्षेशी संबंधित सर्व घटकाच्या निदर्शनास आणून दयावी.

प्र.मा. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**

१) मा. कुलगुरुसाो कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ सोलापूर.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ सोलापूर.